# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 07/08/2015 (का.प.क्र.06) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक 7 ऑगस्ट 2015 रोजी (अर्थसंकल्पीय सभा का.प.क्र .6) मा.सभापती श्री.दिलीप थोरात यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 4-20 वा. वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.प्रकाश महाजन, भाप्रसे, नगर सचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
02. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
03. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
04. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
05. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
06. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
07. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
08. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
09. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
10. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
11. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
12. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
13. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
14. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
15. स.स.श्रीमती रेश्मा अशपाक कुरैशी

**विषय क्र. 09 :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 अन्वये मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या सन 2015-2016 या वर्षीचे मुळ जमा व खर्चाचे अंदाजपत्रकावर विचार विनिमय करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार मान्यता प्रदान करणे.

मुख्यलेखाधिकारी : प्रथमतः मा.आयुक्त यांनी मा.सभापती स्थायी समिती यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करावे.तसेच लेखाधिकारी यांनी स.सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करावे. (या वेळी मा.आयुक्त यांनी मा.सभापती यांचे.व लेखाधिकारी यांनी स.सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.)

मा.आयुक्त :सन 2015-16 अर्थसंकल्प सादर करण्यात येत आहे.

या वेळी मा.आयुक्त यांनी मा.सभापती यांचेकडे सन 2015-16 चा अर्थसंकल्प सादर करतात.

मा.आयुक्त :माहे एप्रील 2015 मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2014-2015 चे सुधारीत व कलम 95 नुसार सन 2015-2016 चे 01 एप्रील 2015 ते 31 जुलै 2015 या कालावधीचे अंतरिम आर्थिक अंदाज (लेखानुदान ) स्थायी समितीसमोर सादर करण्यात येऊन मंजुर करण्यात आले होते.

सर्व प्रथम मी सर्व नवनिर्वाचित सन्माननिय सदस्याचे या सभागृहात स्वागत करतो, यावेळी सभागृहात नव निर्वाचित तरुण तडफदार उच्च शैक्षणिक अर्हता बरोबर अनुभवी सदस्य सुध्दा मोठया प्रमाणावर निवडुन आलेले आहेत. या सर्वाचे महानगरपालिका प्रशासनास या शहराच्या विकासासाठी योग्य व बहुमुल्य मार्गदर्शन व सहकार्य मिळेल अशी मी आशा व्यक्त करतो. हे शहर स्मार्ट सिटी होण्यासाठी सर्वांचे सहकार्य मिळावे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 अन्वये सन 2015-2016 या आर्थिक वर्षासाठीचा महानगरपालिकेच्या स्थापनेनंतरचा तेहतीसावा व प्रशासनामार्फत आयुक्त या नात्याने महानगरपालिकेत नियुक्तीनंतर माझ्या कार्यकाळातील पहिले जमा व खर्चाचे मुळ अंदाज मा.स्थायी समिती सभेसमोर सादर करीत आहे.

प्रशासन प्रमुख या नात्याने मा. महापौर, मा.उप-महापौर, मा.सभापती, स्थायी समिती, सर्व स. पदाधिकारी व सन्माननिय सदस्य यांच्या सहकार्याने उत्पन्न वाढीसाठी मी व माझ्या सहकारी अधिकारी यांनी प्रयत्न केलेले आहे व त्यात आपणास काही अंशी यशसुध्दा प्राप्त झाल्याचे दिसुन येत आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या अनुदान वितरणासाठी नवीन निकषानुसार महानगरपालिकांनी आपले महसुली उत्पन्न हे थकबाकी व चालु मागणी यांचा एकत्रित विचार करून त्यानुसार ते 80% पर्यन्त प्राप्त करून घेणे अनिवार्य असल्यामुळे आपणांस सर्वंकष प्रयत्न करणे आवश्यक आहे ही बाब विचारात घेऊन सन 2015-16 या वर्षासाठी सर्व प्रकारचे महसुली उत्पन्न ज्यामध्ये स्थानिक संस्था कर, मालमत्ता कर, महानगरपालिकेच्या मालमत्ते पासुनचे उत्पन्न इत्यादीचा समावेश आहे. ज्या साठी 80% वसुलीचे उद्घिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.

महसुली उत्पन्न : - स्थानिक संस्था कर

महानगरपालिकेची आर्थिक स्थिती नाजुक व बेताची असुन जमा होणारे महसुली उत्पन्न व अपेक्षित भांडवली व महसुली खर्च यांचे प्रमाण व्यस्त नसल्यामुळे सदर परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रशासन कसोशिने प्रयत्न करीत आहे, दिनांक 01 ऑगस्ट 2015 पासुन राज्य शासनाच्या अध्यादेशानुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांची स्थानिक संस्था करासाठी नोंदणी पात्रता ही रू.50.00 कोटी पेक्षा जास्त वार्षीक उलाढाल असणा-या व्यापा-यांना लागु झाल्यामुळे जवळपास 95% नोंदणीकृत व्यापारी हे स्थानिक संस्था कराच्या आकारणीतुन मुक्त झालेले आहेत.स्थानिक संस्था कराच्या उत्पन्नातील तुट भरून काढण्यासाठी शासन स्थानिक संस्थाना अनुदान वितरीत करणार आहे. त्या अपेक्षेवर स्थानिक संस्थाकराचे अपेक्षित उत्पन्न रु. 225.00 कोटी गृहीत धरण्यात आलेले आहे.

केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी प्रकल्पात औरंगाबाद शहराचा समावेश झालेला आहे, ही जशी आनंददायी घटना आहे त्याच बरोबर सन्माननिय सदस्य म्हणुन आपली व प्रशासन प्रमुख म्हणुन माझ्यावरील जबाबदारी सुध्दा वाढलेली आहे. सदरील योजनेतील निकष व अटीनुसार महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नाची वसुली ही मी सुरुवातीस नमुद केल्याप्रमाणे 80% होणे आवश्यक आहे. शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातुन सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व

स.पदाधिकारी, सर्व स. सदस्य व प्रशासनामार्फत मी शहरातील सर्व नागरीकांना आव्हान करतो की, Smart City च्या पुढील टप्प्यात समाविष्ट होण्यासाठी शहरातील नागरीकांचे अत्यंत मोलाचे योगदान आवश्यक आहे, या शहराची निवड झाली असली तरी पुढील टप्प्याचे अनुदान येण्यासाठी प्रयत्न करावे लागेल. त्यामुळे ज्यांच्याकडे असलेली मालमत्ता कराची व पाणीपट्टीची थकबाकी भरुन प्रशासनास सहकार्य करावे व शहर विकासास व Smart City अंतर्गत समावेषाच्या वाटचालीस सहभाग नोंदवावा अशी अपेक्षा करतो.

मालमत्ता कर :मालमत्ता कराची थकबाकी व चालु मागणी विचारात घेता, सन 2015-2016 या वित्तीय वर्षाकरीता रक्कम रु. 180.00 कोटी चे उद्दिष्ट ठेवण्यात येत आहे. सदर उद्दिष्ट साध्य करणे हे प्रशासनास ते कठिण असले तरीही सर्व स. पदाधिकारी सर्व स. सदस्य व अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने उद्दिष्टपुर्तीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असुन त्यासाठी खालील स्वरूपाच्या उपाय योजना प्रशासनातर्फे करण्यात येणार आहे.

* कर्मचा-यामार्फत शहरात नविन मालमत्तेंचा शोध घेऊन कर आकारणी मोहिम 15 ऑगस्ट 2015 पासुन सुरु करणार.
* शहरातील जुन्या मालमत्तेचे पुर्ननिर्धारण हाती घेणार.
* मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट पुर्तीसाठी विभागनिहाय आढावा घेण्यात आलेला असुन सद्यस्थितील असलेल्या एकुण 1,94,627 मालमत्तेच्या माध्यमातुन मालमत्ता कराच्या वसुली करिता एकुण वर्ग-3 व वर्ग-4 चे 158 कर्मचारी सध्या नियुक्त आहेत. अस्तित्वातील मालमत्ता वसुलीचे सुक्ष्म नियोजन करण्यात आलेले असुन प्रति कर्मचारी 1232 मालमत्ता या प्रमाणात उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांच्या माध्यमातुन व सहकार्यानेच मालमत्ता कराची मॅराथॉन मोहिम राबविण्यात येणार आहे. मनपाचे संबधीत अधिकारी व कर निर्धारक यांनी हैद्राबाद येथे भेट दिली तर तेथे एक कर्मचा-याकडे 2500 मालमत्ता वसूलीसाठी आहे त्यापेक्षा आपल्याकडे निम्म्या आहे कर्मचारी कमी आहे.असे म्हणणे वावगे नाही.वरील प्रमाणे सुक्ष्म नियोजनाच्या आधारे प्रत्येक कर्मचा-यास सरासरी दररोज चार मालमत्ता धारकाकडुन कर वसुली चे उद्दिष्ट येत आहे त्यामुळे प्रशासन प्रमुख म्हणुन या वर्षी मालमत्ता कराचे उद्दिष्ट 100% गाठण्यात येईल असा मला विश्वास आहे.
  * नागरीकांसाठी मालमत्ता कर भरण्यासाठी On line HDFC बँकेमार्फत Keyosk सुविधा पुरविण्यात आलेली आहे, नागरीकांनी या माध्यमाचाही मालमत्ता कर भरण्यास वापर करावा.आता सर्व बँकेत टॅक्स भरण्यासाठी बँकेस ॲथराईज करीत आहोत.ऑनलाईन टॅक्स भरता येईल.
  * औरंगाबाद महानगरपालिकेच्या www.aurangabadmahapalika.org वेबसाईटवर मालमत्ता कर Online भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च लागणार नाही, नागरीकांना या सुविधेचा मोठया प्रमाणावर लाभ घ्यावा असे मी आपल्या माध्यमातुन आव्हान करतो.
  * मालमत्ता कराची वसुली सहा वार्ड कार्यालया व्यतिरिक्त HDFC बँकेच्या शहरातील विविध ठिकाणी असलेल्या सहा शाखेमार्फत करण्यात

येत आहे. या व्यतिरिक्त मालमत्ता कराच्या वसुली मध्ये सुसत्रता येण्यासाठी व करदात्यांना कर भरणा करण्यासाठी सोईस्कर होण्यासाठी शहरातील राष्ट्रीयकृत व शेडयुल, कमर्शीयल बँके सोबत बोलणी करून त्यांच्या समावेश सुद्धा ऑनलाईन सेवा देण्यासाठी करण्यात येईल. त्यामुळे भविष्यात मालमत्ता कर भरणा करणा-या केंद्राच्या संख्येत वाढ होऊन नागरीकांना त्यांचा लाभ होईल.

महानगरपालिकेच्या मालमत्ता पासुनचे उत्पन्न

* महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या सांस्कृतीक सभागृहांचा योग्य बाबींसाठी यथोचित वापर करण्यासाठी त्या मालमत्ता आता महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या असुन सदरील सभागृह व सांस्कृतीक केंद्र हे सर्व भाडेतत्वावर देण्यात येणार असुन त्यामुळे त्या मालमत्तेचे संरक्षण व संवर्धन होईल व त्याच बरोबर मनपाच्या आर्थिक स्त्रोतात भर पडेल.
* महानगरपालिकेच्या मालकीच्या व खाजगी मालकीच्या जागेवर होर्डीग्ज व कमानीवर जाहिराती लावण्यात येतात, यापासुनचे आतापर्यत महानगरपालिकेस कमी उत्पन्न प्राप्त होते, सद्यस्थितीत या दराचे सिद्धशिघ्र गणकानुसार प्रत्येक वर्षी नुतनीकरण होणे आवश्यक होते या बाबीकडे मी जातीने लक्ष केंद्रीत करून दर व कराचे नुतणीकरण करण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे त्यामुळे सन 2015-2016 या आर्थीक वर्षात यापासुन चांगले उत्पन्न प्राप्त हाईल.मनपाच्या मालमत्ता हॉल दुकाने व इतर सर्वाचे रिव्हीजन केले जाईल.

नगररचना विभाग

नगर रचना विभागामार्फत प्राप्त होणारे उत्पन्न हे चौथ्या क्रमांकाचे महत्वाचे उत्पन्न आहे. प्राप्त उत्पन्नातुन भुसंपादन व विविध विकास कामे तसेच मंजुर रेखांकनात कामासाठी सदर रक्कमेचा विनियोग करण्यात येईल अशी तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. सदर विभागामार्फत रू.60.10 कोटीचे उद्यिष्ट निश्चित करण्यात आले आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपिठ औरंगाबाद यांच्या आदेशानुसार या शिर्षांतर्गत जमा होणारी रक्कम स्वतंत्र खात्यावर ठेवणार आहे.व भुसंपादन व नगररचना संबधीत कामासाठी ही रक्कम वापरणार आहोत.

बांधा,वापरा व हस्तांतरीत करा प्रकल्प (BOT Project)

महानगरपालिक्चे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर काही प्रकल्प कार्यान्वीत असुन चालु वर्षात नाविण्यपुर्ण प्रकल्प हाती घेतल्यास यापासुन महानगरपालिकेस रु.3.00 कोटीचे अपेक्षित उत्पन्न गृहीत धरण्यात आलेले आहे.

शाळा इमारत भाडे थकित अनुदान

शासकीय अनुदानांतर्गत राज्य शासनाकडे सन 1987 पासुन प्रलंबित महानगरपालिकेच्या शाळा इमारत भाडेपोटी अनुज्ञेय रक्कम रु. 83.17 कोटी चा समावेश अर्थसंकल्पातील शासकीस अनुदान या मुख्य शिर्षांतर्गत करण्याचा आदेश असुन सदरील अनुदान शासनाकडुन प्राप्त करुन घेण्यात येईल व यासाठी एका स्वतंत्र अधिका-याची नेमणुक करण्यात येईल.

महानगरपालिकेचे सर्व महसुली व भांडवली उत्पन्न विचारात घेता 2015-2016 या वित्तीय वर्षाचे अपेक्षित उत्पन्न रू.749.02 कोटी व प्रारंभीची शिल्लक

रू.24.84 कोटी यासह एकुण रू.773.86 कोटी प्राप्त होईल असे जमेचे अंदाज गृहित धरण्यात आलेले आहे.

भांडवली मत्ता निर्माण करणारे खर्च (Capital Expenditure) :-

हैद्राबाद मुक्ती संग्राम :-

औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने हैद्राबाद मुक्ती संग्रामचे भव्य असे संग्रहालय/स्मारक ऊभारणीचा पहिला टप्पा पुर्ण झालेला असुन हे संग्रहालय नागरीकांसाठी खुले करण्यात आलेले आहे.

मराठवाडयाच्या स्वातंत्र्य लढयाच्या तेजस्वी इतिहास या माध्यमातुन ऊभा राहीला असून, याकामी जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत महानगरपालिकेस शासनाकडुन रु.3.00 कोटी निधी प्राप्त झाला होता. आता दुस-या टप्प्याच्या विस्तारीत कामाकरीता देखील रुपये 6.65 कोटी निधी जिल्हा वार्षीक योजने मधुन उपलब्ध करुन देणे बाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

शहर एकात्मिक रस्ते योजना :-

राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोई-सुविधांच्या विकासाकरीता विशेष अनुदान या योजने अंतर्गत शासन निर्णय क्र.संकीर्ण-2014/प्र.क्र.65/नवि-16, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 9 मार्च, 2015 नुसार रुपये 24.33 कोटी निधी शहरातील रस्ते विकास करणे करीता वितरीत करण्यात आला आहे. या निधी मधुन शहरातील पाच रस्त्यांची कामे करण्यात येत आहेत.

स्मार्ट सिटीसाठी आर्थिक तरतुद :-

केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी प्रकल्पात औरंगाबाद शहराच्या समावेश होणेसाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेने पारीत केलेल्या ठरावानुसार तसेच महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार विवरणपत्रातील विहीत गुणांक तक्त्यातील माहिती महाराष्ट्र शासनाकडे सादर केलेली आहे. प्राप्त माहितीनुसार महाराष्ट्रातील एकुण दहा शहरांपैकी या प्रकल्पामध्ये औरंगाबाद शहराची निवड करण्यात आली आहे. या योजने करीता आवश्यक सर्व निकष व अटी वेळोवेळी विषद करण्यात आल्या आहेत. या योजनेंतर्गत शहराचा समावेश होईल अशी अपेक्षा गृहीत धरुन अर्थसंकल्पात रु. 50.00 कोटीची विशेष तरतुद करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये भांडवली खर्चासाठी एकुण रू.435.37 कोटीची तरतुद करण्यात आली असुन या मध्ये प्रामुख्याने :-

समांतर जलवाहिनी :- रू.119.00 कोटी

स्मॉट सिटी प्रकल्प :- रू.50.00 कोटी

कर्ज परतफेड :- रू.50.00 कोटी

वार्ड अ ते फ भांडवली विकास कामे :- रू.90.00 कोटी

भुसंपादन विकास कामे :- रू.25.00 कोटी

मंजुर रेखाकंनात विकास कामे :- रू.35.00 कोटी

प्रोपुअर बजेट :- रू.20.00 कोटी

महसुली खर्च :-

महसुली खर्चासाठी रू.318.20 कोटीची तरतुद करण्यात आलेली

असुन या मध्ये प्रामुख्याने :-
वेतन भत्ते व प्रशासकीय खर्च :- रू.182.00 कोटी
विद्युत देयक खर्च :- रू.12.00 कोटी

शहरातील रस्ते, दुरुस्ती, पॅचवर्क, रस्ते पुर्नडांबरीकरण,
विद्युत देखभाल दुरूस्ती खर्च, ड्रेनेज देखभाल दुरूस्ती खर्च:-रू.86.90 कोटी
अंदाजपत्रकामध्ये एकुण रू.179.11 कोटीची कामे असुन या करिता रू.141.25 कोटीची तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

करिता सन 2015-2016 चे मुळ अंदाज जमा रु.749.02 कोटी यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु.24.84 कोटी असे एकुण 773.86 कोटी जमा व खर्च रु. 773.81 कोटी यानुसार रु.5.00 लक्ष शिल्लकीचे जमा व खर्चाचे अंदाज मा. स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

प्रशासन प्रमुख म्हणुन आज रोजी मी आपल्या समोर जे जमा व खर्चाचे अंदाज सादर करीत आहे, ते मुळात गृहीतांक आधारे असुन दैनंदिन खर्च हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 60 (अ) चे परंतुक -3 चे (5) प्रमाणे पैशाचा ओघ (Cash Flow) विचारात घेऊन भागवावा लागेल त्यामुळे आपणास आर्थिक शिस्तीचा अवलंब करणे अनिवार्य राहणार आहे, यासाठी आपले मोलाचे सहकार्य अपेक्षित आहे.

माझ्या कार्यकाळात सभापती, विधानसभा महाराष्ट्र राज्य मा.श्री हरीभाऊजी बागडे, मा.पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, औरंगाबाद श्री.रामदासजी कदम, मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे, मा.खासदार श्री रावसाहेबजी दानवे, मा. खासदार राज्यसभा श्री.राजकुमारजी धुत, मा.आ.श्री.संजयजी शिरसाट, औरंगाबाद (पश्चिम), मा.आ.श्री.अतुलजी सावे औरंगाबाद (पुर्व), मा.आ. श्री.इम्तियाजजी जलील औरंगाबाद (मध्य), मा.आ.श्री.सतीष चव्हाण, मा.आ. श्री.सुभाषजी झांबड, मा.आ.श्री.विक्रमजी काळे यांनी वेळोवेळी मोलाचे मागदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे त्यांचे सहकार्य व मागदर्शन या पुढेही मला लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

तसेच मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता तसेच सर्व पक्षाचे गटनेते व स.सदस्य यांनी मला आतापर्यन्त विशेष सहकार्य केले आहे व यापुढेही अशाच प्रकारचे सहकार्य राहील असा मला पुर्ण विश्वास आहे तशी आशा बाळगतो.

तसेच सर्व पत्रकार बंधु, इलेक्ट्रानिक प्रसार माध्यमे व आकाशवाणी महानगरपालिकेच्या लोकाभिमुख प्रकल्प व विकास योजनांना प्रसिध्दी देऊन महानगरपालिकेस सहकार्य राहीला या अपेक्षेसह सर्वांचे धन्यवाद !

श्री.गजानन बारवाल :सुखद अर्थसंकल्प सादर केलेला आहे.आपणा सर्वांना विकास कामासाठी नेहमीच संघर्ष करावा लागतो सर्व बाबीचा विचार करता बजेट सादर केले त्याबध्दल मा.आयुक्ताचे सर्वाच्या वतीने आभार व्यक्त करतो. या वर सखोल अशी चर्चा होणे अपेक्षीत वाटते हे शहर स्मार्ट सिटीमध्ये येत आहे ,समांतर प्रश्न असेल, कर्ज परतफेडीचे अडचणी, भुसंपादनाची कामे मंजूर विकास योजनेतील कामे हाती घ्यावी लागणार यासाठी सर्वाचे प्रयत्न आवश्यक आहे.अनेक उत्पनाचे स्त्रोत्र समोर

ठेवले याची दखल घेऊन उत्पन्न वाढवावे लागेल.या विषयी सविस्तर चर्चा करावी लागणार आहे अभ्यास करण्यासाठी 7 दिवसाचा वेळ दयावा त्यानंतर तेंव्हा सभा आयोजित करावी आजची सभा तहकूब करावी बजेट वेळेवर सादर केल्याने मा.आयुक्त व त्यांचे टीमचे अभिनंदन करतो.

श्री.मोहन मेघावाले :जास्तीत जास्त उत्पन्न मिळण्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्याची गरज आहे.सर्व प्रयत्न करून व जास्तीत जास्त विकास कसा होईल यासाठी कार्य करू या बजेटवर अभ्यास करण्यासाठी वेळ दयावा.नंतर सभा आयोजित करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :चांगल्या बजेट सादर केले हैद्राबाद येथे मालमत्ता करा संदर्भात माहिती व विविध उपाययोजनाची माहिती घेण्यासाठी मनपाची टीम गेले होते.या शहरात माझ्या माहिती प्रमाणे सन 1980-84 ला जो कर होता तोच कर आजही काही घरांना आहे स्मार्ट सिटी जात असतांना या सर्व गोष्टीकडे लक्ष केंद्रीत होणे आवश्यक आहे उत्पन्न वाढविण्यासाठी सर्वानी प्रयत्न करावे जे की हे शहर ग्रीन व क्लीन असायला पाहिजे.अनेक पर्यटक येथे येतात चांगले शहर व्हावे ही अपेक्षा प्रशासनाकडून करतो उत्पन्न वाढीसाठी व विकास कामे होण्याकरीता या सभागृहाचे प्रशासनाला योग्य ते सहकार्य असेल. प्रशासनाने ही त्या पध्दतीने कसरतीने काम करावे अशी आमची अपेक्षा आहे.

मा.सभापती :प्रशासनाच्या मार्फत 2015-16 चे अर्थसंकल्प सादर केलेला आहे. यावर अभ्यास करण्यासाठी सभागृहाने वेळ मागितला आहे सभेची वेळ व तारीख निश्चित करून स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. आजची सभा तहकूब करण्यात येते.

या बरोबर सभा तहकूब केल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद